# कुलगुरू नावांची यादी राज्यपालांच्या कार्यालयात

## शोध समितीचे प्रतिनिधी म्हैसकर आज राज्यपालांना भेटणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ कुलगुरु पदासाठीच्या मुलाखतींची प्रक्रिया रविवारी पार पडली. कुलगुरु शोध समितीकडून दोन दिवसात २८ उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती घेण्यात आल्या. यापैकी ५ उमेदवारांची नावे राज्यपालांकडे सादर करण्यासाठी आज शोध समितीचे शासन प्रतिनिधी मिलींद म्हैसकर राज्यपालांची भेट घेणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा १७ मार्च रोजी कार्यकाल संपला. त्यांच्या रिक्त जागी कुलगुरूंची निवड प्रक्रिया मार्च



महिन्यापासून सुरू होती. आयएएस अधिकारी मिलींद म्हैसकर, अश्विनी कुमार नांगिया, व्ही. सतीश रेड्डी यांची कुलगुरू शोध समिती तयार करण्यात आली. कुलगुरू पदासाठी तब्बल १६९ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी २५ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले होते. पात्र उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया रविवारी पार पडली.

### विद्यापीठ वर्तुळाला नूतन कुलगुरूंची प्रतिक्षा

गेल्या सहा महिन्यापासून विद्यापीठाचा कारभार प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर सांभाळत होते. त्यांच्याकडे पुणे आणि शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा कार्यभार असल्याने. शिवाजी विद्यापीठाला पुरेसा वेळ देणे शक्य नव्हते. परंतू नूतन कुलगुरु रूजू झाल्यानंतर विद्यापीठ प्रशासनासह प्राध्यापकांचे बरेच प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील, अशी कर्मचाऱ्यांना आशा आहे. त्यामुळे विद्यापीठ वर्तुळाला नूतन कुलगुरूंची प्रतिक्षा आहे.

# कुलगुरुपदासाठीच्या पाच उमेदवारांची नावे आज सादर होण्याची शक्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदासाठीच्या अंतिम मुलाखतीसाठीच्या पाच उमेदवारांची नावे आज, मंगळवारी कुलपतींना सादर होण्याची शक्यता आहे. कुलगुरु शोधसमितीने त्यासाठी कुलपती कार्यालयाकडे वेळेची मागणी केली आहे.

या पदासाठीच्या मुलाखतीच्या पहिल्या फेरीची प्रक्रिया शनिवारी (दि. २६) पूर्ण झाली. कुलगुरु शोध समितीने शॉर्टलिस्ट केलेल्या २५ उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. त्यानंतर अंतिम मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी या समितीने पाच



उमेदवारांची नावे निश्चित केली असल्याचे समजते. ही समिती संबंधित उमेदवारांची नावे कुलपतींना सोमवारी सादर करण्याची शक्यता आहे. ही नावे सादर झाल्यानंतर कुलपतींच्या उपस्थितीत अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती होतील. त्यातून एका उमेदवाराची कुलगुरुपदी नियुक्ती होईल. या पाचजणांमध्ये कोणत्या उमेदवारांचा समावेश आहे. त्यातून कोणाची कुलगुरुपदी वर्णी लागणार याबाबतची उत्सुकता विद्यापीठातील विविध घटकांना लागली आहे.

## आचारसंहितेपूर्वी निवड प्रक्रिया

पुणे पदवीधर मतदारसंघातील निवडणूक नोव्हेंबरमध्ये होणार आहे. त्याची आचारसंहिता ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही आचारसंहिता लागण्यापूर्वी कुलगुरु निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे समजते.